राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये दाखल तक्रार

तक्रार क्रमांक -१०१/२०१९/सातारा

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे-१

| तक्रारदार | उत्तरवादी |
|---|---|
| श्री. विजय नामदेव करंजकर | कार्यालय प्रमुख, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विजवितरण कार्यालय मेढा, ता. जावली, जि. सातारा |

(निर्णय दिनांक-१८/०२/२०२५)

तक्रारदार यांनी दिनांक १६/०४/२०१९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ नुसार तक्रार अर्ज दाखल केला आहे. तक्रारदार यांना 'महाराष्ट्र राज्य विजवितरण कंपनी मेढा यांचेकडून माहिती हवी आहे तसे लेखी लिहिलेल्या अर्जावर मेढा येथे १० रुपये स्टॅप उपलब्ध नसून तक्रारदार यांनी कंपनी येथे रोख रक्कम देत असताना ते रोखीने पैसे जमा करत नाही', तर मला तसे लिहून देण्यात यावे हि विनंती', आयोगाकडे केलेली आहे.

तक्रारदार यांनी केलेली विनंती विचारात घेता ती सर्वसाधारण व प्रशासकीय स्वरुपाची असल्याने या प्रकरणी त्यांनी सदर तक्रार अर्ज कार्यालय प्रमुख, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विजवितरण कार्यालय मेढा, ता. जावळी जि. सातारा यांचेकडे करणे अपेक्षीत आहे. सबब, सदर तक्रार अर्जाची प्रत कार्यालय प्रमुख, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विजवितरण कार्यालय मेढा यांना आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत असून सदर तक्रार अर्जावर १५ दिवसात उचित कार्यवाही करुन तक्रारदार याना कळविण्यात यावे.

वरील निर्देशासह सदर तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

तक्रारदार यांचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते पुणे खंडपीठ

18.2.25

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

तक्रार क्र.-१०१/२०१९/सातारा / 7390/2025

दिनांक - 6/3/2025